आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१७ जून २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या शेतकरी सन्मान निधीअंतर्गत १७ वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यांत जमा करणार
- रायबरेलीची खासदारकी कायम ठेवत वायनाड लोकसभा मतदारसंघ सोडण्याचा राहुल गांधा यांचा निर्णय / वायनाडमधून प्रियंका गांधी निवडणूक लढवणार
- ईद उल अजहा, अर्थात बकरी ईद सर्वत्र उत्साहानं साजरी

  **आणि**
- पश्चिम बंगालमधे कांचनजंगा एक्सप्रेसला मालगाडीनं धडक दिल्यानं झालेल्या अपघातात ९ जणांचा मृत्यू, ६० जण जखमी

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या उत्तर प्रदेशातल्या वाराणसीतल्या कार्यक्रमात प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधीअंतर्गत २० हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कमेचा १७ वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यांत जमा करणार आहेत. याचा लाभ नऊ कोटी २६ लाख शेतकऱ्यांना होणार आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ११ कोटींपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना तीन लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कमेचा लाभ झाला आहे. याच कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते स्वयं सहाय्यता गटातील ३० हजारांहून अधिक महिलांना **कृषी सखी** प्रमाणपत्राचं वाटप करणार आहेत. निवडक ५० कृषी विकास केंद्रांवरही विशेष कार्यक्रमांचं आयोजन यावेळी केलं जाणार आहे.

दरम्यान, प्रधानमंत्री उद्या आणि परवा उत्तर प्रदेश आणि बिहार राज्याच्या दौऱ्यावर आहेत. ते उद्या संध्याकाळी वाराणसीतल्या दशाश्वमेध घाटावर गंगा आरतीमध्ये सहभागी होतील आणि त्यानंतर ते काशी विश्वनाथ मंदिरात जाऊन दर्शन घेतील.

बुधवारी प्रधानमंत्री बिहार दौऱ्यावर असून यावेळी त्यांच्या हस्ते राजगीर इथल्या नालंदा विश्वविद्यालयाच्या परिसराचं उद्घाटन करतील. या कार्यक्रमाला १७ देशांमधील नामवंत व्यक्ती सहभागी होणार आहेत. यावेळी प्रधानमंत्र्यांची जाहीर सभा होणार आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशातल्या रायबरेली आणि केरळमधल्या वायनाड मतदारसंघातून निवडून आलेले काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी वायनाड मतदारसंघातल्या लोकसभा सदस्यत्वाचा राजीनामा द्यायचा निर्णय घेतला आहे. ते आता रायबरेलीचं प्रतिनिधित्व करतील. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आज ही घोषणा केली.

राहुल गांधी यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या वायनाडच्या जागेवर काँग्रेस सरचिटणीस प्रियांका गांधी निवडणूक लढवतील, असं खरगे यांनी जाहीर केलं.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज नवी दिल्लीत मणिपूरमधील सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतली. शाह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला केंद्रीय गृह सचिव अजय भल्ला, गुप्तचर विभागाचे अध्यक्ष

तपन डेका, लष्कर जनरल मनोज पांड्ये, मणिपूरचे पोलिस महासंचालक राजीव सिन्हा यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जॅक सुलीवन यांनी आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची नवी दिल्लीत भेट घेतली. जागतिक हितासाठी भारत-अमेरिका सर्वसमावेशक जागतिक धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत करण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी समाजमाध्यमावरील पोस्टमध्ये म्हटलं आहे.

दरम्यान, सुलीवन यांनी परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांची ही भेट घेतली.स्थानिक तसंच जागतिक महत्वाच्या मुद्द्यांवर द्विपक्षीय चर्चा झाल्याची माहिती जयशंकर यांनी बैठकीनंतर दिली.

**<><><><><>**

भारतीय जनता पार्टीनं विधानसभा निवडणुकीसाठी केंद्रीय मंत्री भुपेंद्र यादव यांची महाराष्ट्राचे निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती केली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव राज्याचे निवडणूक सहप्रभारी म्हणून काम पाहतील.

**<><><><><>**

१८व्या मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा आज तिसरा दिवस आहे. याविषयीचा अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून....

**होल्ड--व्हाईस कास्ट...**

*(मिफमध्ये आज प्रतिष्ठेच्या बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी गेल्या काही वर्षांत निवडल्या गेलेल्या काही निवडक चित्रपटांसोबत रशिया, इराण,*

*इटली इत्यादी देशांचे, तसंच भारतीय लघुपट, माहितीपट आणि ॲनिमेशनपट, ऑस्करसाठी निवडलेले लघुपट दाखवले जात आहेत. याअंतर्गत, २०२०मध्ये बर्लिन चित्रपट महोत्सवात दाखवलेल्या 'गुमनाम दिन' हा लघुपटाच्या दिग्दर्शक एकता मित्तल यांनी वार्ताहरांशी संवाद साधला. सामाजिक परिवर्तन आणण्यात माहितीपटांची भूमिका, स्त्रीकेंद्री कथानकं, कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राचा माहितीपटांवर होणारा परिणाम, ॲनिमेशन आणि व्हिज्युअल इफेक्ट्स इत्यादी विषयांवरची चर्चासत्रं, परिसंवाद आणि कार्यशाळाही आज झाली. हा महोत्सव २१ जूनपर्यंत चालणार आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी, अंकिता आपटे, मुंबई.)*

**<><><><><>**

ईद-उल-अजहा हा सण देशभरात उत्साहानं साजरा होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारतीयांना 'इद उल अजहा'च्या शुभेच्छा दिल्या आहेत.

ईद उल अजहा हा त्यागाचं स्मरण करण्याचा दिवस आहे आणि आनंद वाटून घेण्याचा संदेश त्यातून मिळतो, असं राष्ट्रपती मुर्मू यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. या सणाच्या माध्यमातून एकात्मता, करुणा आणि सार्वभौमत्व या मुल्यांची जपणूक करावी, असं आवाहन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे.

ईद-उल अजहा या खास दिवसाच्या निमित्तानं समाजात एकोपा आणि सुसंवाद वाढीला लागावा, अशा सद्भावना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात व्यक्त केल्या आहेत. महाराष्ट्रातही ईद उत्साहानं साजरी करण्यात आली.

**<><><><><>**

पश्चिम बंगालच्या न्यु जलपायगुडी स्थानकाजवळ सियालदाहला जाणाऱ्या कांचनजंगा एक्सप्रेसला मालगाडीनं पाठीमागून धडक दिल्यानं झालेल्या अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला, तर ६० जण जखमी झाले आहेत. मालगाडी चालकानं सिग्नलकडे दुर्लक्ष केल्यानं हा अपघात झाल्याचं प्रथमदर्शनी निदर्शनाला आलं आहे, अधिक तपासनंतरच अपघाताचं नेमकं कारण समोर येईल, असं रेल्वे बोर्डाच्या अध्यक्ष जया वर्मा-सिन्हा यांनी सांगितलं.

या अपघातात जखमी झालेल्यांवर नॉर्थ बंगाल वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात उपचार सुरू आहेत. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी घटनास्थळाची पहाणी केली. त्यानंतर त्यांनी रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली. रेल्वेकडून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी १० लाख रुपये, गंभीर जखमींना अडीच लाख रुपये, तर किरकोळ जखमींना ५० हजार रुपये देण्याची घोषणा त्यांनी केली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

रिपब्लिक ऑफ साऊथ आफ्रिकेचे अध्यक्ष सिरील रामाफोसा पुन्हा निवडून आल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांचं अभिनंदन केलं आहे. आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात मोदी यांनी भारत आणि दक्षिण आफ्रिकेची धोरणात्मक भागीदारी अधिक बळकट करण्यासाठी रामफोसा यांच्याबरोबर काम करण्यास उत्सुक असल्याचं म्हटलं आहे.

**<><><><><>**

उत्तर काश्मिरच्या बांदीपूर जिल्ह्यातल्या अरगामा इथं सुरक्षा दलाबरोबर झालेल्या चकमकीत एक दहशतवादी ठार झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार या परिसरात दहशतवादी लपले असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर लष्कर, केंद्रीय राखीव पोलिस आणि जम्मू काश्मिर पोलिसांनी संयुक्त कारवाई केली. दहशतवादी लपलेल्या ठिकाणी सुरक्षा दलाचं पथक गेलं असता त्यांच्यावर अंदाधुंद गोळीबार केला. दहशतवाद्यांना सुरक्षा दलाच्या पथकानं चोख प्रत्युत्तर दिलं. या चकमकीत एक दहशतवादी ठार झाला.

<><><><>

इटालियन खुल्या महिला गोल्फ स्पर्धेत भारताची दीक्षा डागर हिला  सहावं स्थान मिळालं आहे. या स्पर्धेचं विजेतेपद मिळवलेल्या इंग्लंडची एमी टेलर हिच्यापेक्षा दीक्षा चार शॉट मागं होती. पुढच्या आठवड्यात दीक्षा चेक महिला खुल्या गोल्फ स्पर्धेत सहभागी होणार आहे. गेल्यावर्षी दीक्षानं या स्पर्धेचं  विजेतेपद पटकावलं होतं.

<><><><>

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज श्रीलंकेनं नेदरलँडचा ८३ धावांनी पराभव केला. श्रीलंकेने केलेल्या २०१ धावांचा पाठलाग करताना नेदरलँडचा संघ ११८ धावांवर गारद झाला. २१ चेंडूत ४६ धावा करणारा श्रीलंकेचा चेरित असालंका सामनावीर ठरला.

आजच्या दुसऱ्या सामन्यात बांगलादेशानं नेपाळला २१ धावांनी हरवलं. प्रथम फलंदाजी करणाऱ्या बांगलादेशानं नेपाळसमोर उभारलेलं १०६ धावांचं आव्हान पूर्ण करताना नेपाळचा संघ ८५ धावात ढेपाळला. या विजयामुळे बांगलादेशानं सुपर ८ मध्ये आपलं स्थान पक्कं केलं आहे, तर नेपाळ स्पर्धेतून बाहेर पडला आहे.

स्पर्धेतला आजचा तिसरा सामना त्रिनिदाद इथं न्यूझिलँड आणि पापुआ न्यू गिनी यांच्यात होत आहे. मैदान ओलं असल्यानं सामना सुरु व्हायला विलंब झाला आहे.

<><><><><>

उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश, पंजाब, हरियाणा आणि दिल्लीच्या काही भागांत पुढील दोन दिवस उष्णतेची लाट येण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे. वायव्य भारताकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे उष्णतेची लाट हळूहळू कमी होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. जम्मू-काश्मीर, उत्तर मध्यप्रदेश आणि आंध्र प्रदेशचा किनारी भाग, राजस्थान, विदर्भ आणि पश्चिम बंगालच्या विविध भागांत उष्णेतेची तीव्र लाटेची शक्यता आहे.

दरम्यान, आगामी तीन दिवस पश्चिम बंगालचा काही भाग, आसाम, मेघालयात मुसळधार पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे. पुढचे पाच दिवस अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरातही पावसाच्या हलक्या सरी पडण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//